# अभियोगाधीन व्यक्ती पुनर्विलोकन समिती आणि आपण

## अभियोगाधीन व्यक्ती पुनर्विलोकन समिती म्हणजे काय?

सर्वोच्च् न्यायालयाच्या एप्रिल २०१५ च्या दिशा निर्देशानुसार जिल्हा स्तरावर अभियोगाधीन व्यक्ती पुनर्विलोकन समितीची स्थापना करण्यात आली आहे. सर्व कैद्यांच्या प्रकरणांचे समितीने किमान दर तीन महिन्यातून एकदा पुनर्विलोकन करणे बंधनकारक आहे. समितीने सर्व पात्र कैद्यांचे पुनर्विलोकन करून सुटकेसंदर्भात योग्य ती शिफारस करावी असे अपेक्षित आहे.

## या समितीचे सदस्य कोण आहेत?

जिल्ह्यातील पाच वरिष्ठ कायदेविषयक अधिकारी या समितीचे सदस्य असतील.

१. जिल्हा आणि सेशन न्यायाधीश -समितीचे अध्यक्ष
२. जिल्हा दंडाधिकारी -सदस्य
३. DLSA चे सचिव -सदस्य
४. जिल्ह्यातील सर्व तुरुंगाचे प्रभारी अधिकारी - सदस्य
५. पोलिस अधीक्षक - सदस्य

## समितीचे काम कसे चालते?

1 **तयारी:** तुरुंग अधीक्षक सर्व कैद्यांची यादी DLSA चे सचिव यांना पाठवतात. DLSA चे सचिव या यादीतून निकषानुसार कैद्यांची यादी तयार करतात

2 **बैठक:** जिल्हा आणि सेशन न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली अभियोगाधीन व्यक्ती पुनर्विलोकन समितीची बैठक घेतली जाते व सदस्य यादीचे पुनर्विलोकन करून योग्य ती शिफारस करतात

3 **शिफारसी व कारवाई:** समितीच्या सर्व शिफारशींचे प्रलेखन करून त्या सर्व सदस्यांना प्रसारित केल्या जातात आणि संबंधित न्यायालयाला विचारार्थ पाठवल्या जातात

4 **पाठपुरवठा:** पुढील बैठकांमध्ये या शिफारसींवरील कारवाई लक्षात घेऊन प्रत्येक प्रकरणाच्या स्थितीची नोंद घेतली जाते

## तुमचे प्रकरण समितीकडे पुनरावलोकनासाठी येणे म्हणजे तुमची सुटका नक्की आहे का?

नाही, तुमचे प्रकरण समितीकडे पुनरावलोकनासाठी येणे किंवा समितीने तुमच्या सुटकेची शिफारस करणे याचा अर्थ तुमची सुटका नक्की झाली आहे असा होत नाही. तुमच्या वकिलाने न्यायालयात अर्ज ही करावा लागेल. तुमचा अभियोग ज्या न्यायालयात विलंबित आहे, त्या न्यायालयाने तुमच्या सुटकेची शिफारस ग्याह्य धरणे आवश्यक आहे. तुम्ही तुमच्या प्रकरणासंबंधित स्थिती, शिफारस आणि प्रगतीबद्दल तुरुंगाधिकारी किंवा तुमच्या वकिलांकडे चौकशी करू शकता

## समितीने तुमच्या प्रकरणासंदर्भात यापूर्वी पुनर्विलोकन केले असल्यास पुन्हा पुर्विलोकन होणे शक्य आहे का?

हो, समितीने अनेकदा प्रकरणे पुनर्विलोकन शक्य आहे. यापूर्वी समितीने तुमच्या सुटकेची शिफारस केली नसेल किंवा न्यायालयाने समितीची शिफारस नाकारली असेल तरी तुमचे प्रकरण समिती पुनर्विलोकन करणे शक्य आहे

## तुम्ही दोषी आढळून आल्यास समिती तुमच्या प्रकरणाचे पुनर्विलोकन करू शकेल का?

समिती तुमच्या प्रकरणाचे पुनर्विलोकन करु शकेल, जर -
१. तुम्ही तुमच्या शिक्षेचा कालावधी तुरुंगात व्यतीत केला आहे किंवा
२. तुम्हाला माफी मिळाल्याने तुमची सुटका होणे शक्य आहे.
समिती तुमच्या बंदिवासाच्या कारणांचे पुनर्विलोकन करून तुमच्या सुटकेबाबत योग्य ती शिफारस करू शकते.

## तुम्ही अभियोगाधीन व्यक्ती पुनर्विलोकन समितीकडून पुनर्विलोकनास पात्र आहेत का हे कोणाकडून समजेल?

तुमच्या पात्रतेविषयक शंका आणि समस्यांसाठी तुम्ही किंवा तुमचे कुटुंबीय तुमच्या वकिलाला किंवा तुरुंगात भेट देणाऱ्या वकिलाला किंवा तुरुंगातील कायदेशीर मदत क्लिनिकमधील पॅरालीगल स्वयंसेवकास संपर्क साधू शकता

## तुमचे प्रकरण अभियोगाधीन आहे आणि:

- तुमच्यावर क्षुल्लक गुन्ह्याचा आरोप आहे ज्यासाठी कमाल बंदी कालावधी २ वर्षांपेक्षा जास्त नाही अथवा, (क्षुल्लक गुन्ह्यामध्ये असे गुन्हे समाविष्ट होतात ज्यासाठी शिक्षा लहान दंड किंवा काही महिन्यांची कैद आहे.)
- तुमचे वय १९ ते २१ च्या दरम्यान आहे, तुमच्या शिक्षेचा कमाल कालावधी ७ वर्षांपेक्षा जास्त नाही आणि तुम्ही आरोपाखाली तुमच्या शिक्षेच्या कालावधीच्या १/४ कालावधी बंदिवासात काढला आहे अथवा,
- तुम्हाला चोरी, फसवणूक किंवा अन्य क्षुल्लक आरोपांखाली अटक झाली आहे (अनुच्छेद ३७९, ३८०, ३८१, ४०४, ४२०) किंवा आरोपांचा कमाल कालावधी २ वर्षे आहे अथवा,
- 60 DAYS तुम्ही तुरुंगात ६० दिवसांहुन अधिक काळ बंदी आहात, तुमच्यावरील आरोपांखाली शिक्षेचा कमाल कालावधी १० वर्षांहून कमी आहे आणि अद्याप आरोपपत्र दाखल झाले नाही अथवा,
- 90 DAYS तुम्ही तुरुंगात ९० दिवसांहुन अधिक काळ बंदी आहात, तुमच्यावरील आरोपांखाली शिक्षेचा कमाल कालावधी १० वर्षे किंवा अधिक आहे आणि अद्याप आरोपपत्र दाखल झाले नाही अथवा,
- 180 DAYS तुम्ही तुरुंगात १८० दिवसांहुन अधिक काळ बंदी आहात, तुमच्यावर अंमली पदार्थांचे औषध आणि सायकोट्रॉपिक पदार्थ कायद्याखाली व्यावसायिक प्रमाणात अमली पदार्थ बाळगल्याच्या आरोप आहे आणि अद्याप आरोपपत्र दाखल झाले नाही अथवा,
- तुमच्यावरील आरोपासाठी कमाल शिक्षेमध्ये फाशीची शिक्षा समाविष्ट नाही आणि तुम्ही तुमच्यावरील आरोपांखाली शिक्षेच्या कमाल कालावधीच्या अर्धा कालावधी बंदिवासात काढला आहे अथवा,
- 7 तुमच्यावरील आरोप जामीनपात्र गुन्हा असून तुम्हाला ताब्यात घेऊन ७ पेक्षा अधिक दिवस झाले आहेत अथवा, (जामीनपात्र गुन्ह्यांतर्गत आरोपीला हमीपत्र देऊन जामीन मिळू शकतो)
- तुमच्यावरील आरोप अजामीनपात्र गुन्हा असून दंडाधिकाऱ्यांसमोर चालवता येणार खटला आहे आणि खटल्याचे कामकाज पुरावा दाखल केल्यापासून ६० दिवसात पूर्ण झाले नाही (सहसा ज्या गुन्ह्याची कमाल शिक्षा ३ वर्षांपेक्षा कमी नसेल अशा गुन्ह्यांचे खटले दंडाधिकाऱ्यांसमोर चालवता येतात.)
- तुमच्यावरील आरोपांसाठी न्यायालयाबाहेर मिटवण्याची सुविधा आहे ( गंभीर नसलेल्या आणि २ वर्षांहून कमी कालावधीची कमाल शिक्षा असलेल्या प्रकरणात न्यायालयाबाहेर तोडगा काढण्याची सुविधा आहे. अशा गुन्ह्यांची सूची अनुच्छेद ३२० मध्ये आहे.)
- तुम्ही आजारी वा अशक्त आहेत आणि तुम्हाला विशेष वैद्यकीय मदतीची गरज आहे अथवा,
- तुम्ही विकल मानसिक परिस्थितीमध्ये आहात किंवा मानसिकरीत्या रोगी आहात अथवा,
- तुम्हाला जामीन मिळाला आहे परंतु तुम्ही हमी मिळवू शकला नाही अथवा,
- तुम्हाला गुन्हेगारी प्रक्रिया कोड अनुच्छेद १०७, १०८, १०९ किंवा १५१ नुसार ताब्यात घेतले आहे अथवा,
- तुम्ही स्त्री आहात

गुन्हेगारी प्रक्रिया कोडनुसार गुन्ह्याचे वर्गीकरण करण्यात आले असून गुन्ह्यानुसार जामीनपात्र गुन्हा, कमाल बंदी कालावधी, दंडाधिकाऱ्यांसमोर चालवता येणार खटला ही माहिती देण्यात आली आहे. तुम्हाला ज्या आरोपाखाली अटक झाली आहे, त्या नुसार तुम्ही पुनर्वियोग समितीसाठी पात्र आहात किंवा नाही, याबाबत माहिती तुमच्या वकिलाला किंवा तुरुंगात भेट घेणाऱ्या वकिलाला विनंती करून विचारू शकता

**तर तुमचा खटला जिल्ह्यातील अभियोगाधीन व्यक्ती पुनर्विलोकन समितीद्वारे पुनर्विलोकनास पात्र आहे**


CHRI
Commonwealth Human Rights Initiative
working for the *practical* realisation of human rights in the Commonwealth

**Commonwealth Human Rights Initiative**
3rd Floor, 55A, Siddhartha Chambers, Kalu Sarai, New Delhi - 110 016
Tel: + 91-11-43180200, +91-11-43180221 (Direct) Fax: +91-11-43180217
Email: info@humanrightsintiative.org. Website: www.humanrightsinitiative.org